| | दुरध्वनी क्रमांक (07132) 222347 | जिल्हा परिषद,गडचिरोली<br>शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>Email :- coprygadchiroli@gmail.com |
|---|---|---|
| | जा.क्र./जिपग/शिवी/स्था-1/ 2880 /2024, दिनांक :-24/07/2024. | |

प्रति,

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती ..............................(सर्व)

**विषय :- पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत. (स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळातील सेवा निवृत्त शिक्षक)**

**संदर्भ-** 1) मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. सकीर्ण-2023/प्र.क्र.362/ टिएनटि-1, दिनांकः- 07/07/2023.

2) कक्ष अधिकारी शा.शि. व क्रिडा वि. यांचे पत्र क्रमांक संकीर्ण 2024/प्र.क्र.414/टिएनटि-1, दिनांकः- 15.07.24

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या जिल्हयातील सर्व शाळा हया जुलै महिन्यात सुरु झालेल्या असून जिल्हा परिषद शाळांतील पेसा क्षेत्रातील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्याथ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, नियोजित शिक्षक भरती संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदरची सर्व परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवा निवृत शिक्षकांमधून कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील पेसा क्षेत्रातील रिक्त शिक्षकीय पदे संदर्भिय पत्रात दिलेल्या तरतुदीप्रमाणे भरण्याबाबत निर्देशित केले आहे.

वरील निर्देश लक्षात घेता आपल्या तालुक्यात निवृत्ती वेतन घेतअसलेल्या अथवा आपल्या तालुक्या अंतर्गत कायमस्वरुपी रहिवासी असलेल्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक / पदविधर शिक्षक / उच्च श्रेणी मुख्याध्यापक हे कंत्राटी तत्वावर अध्यापन करण्यास इच्छूक असल्यास सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज अशा सेवानिवृत्त कर्मचा-यांकडुन दिनांक 31/07/2024 पर्यंत मागवुन या कार्यालयास संपूर्ण अर्ज खालील प्रपत्रातील माहितीसह दिनांक 01/08/2024 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत न चुकता हॉर्ड कॉपीसह व Excel sheet सॉफ्ट कॉपीसह सादर करावे. सदर कामात दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. सेवानिवृत्त झालेल्या अप्रशिक्षीत प्राथमिक शिक्षकांकडुन अर्ज स्विकारण्यात येऊ नये.

Scanned with OKEN Scanner

**सहपत्र :-** विहित अर्जाचा नमुना.

## प्रपत्र

| अ.क्र. | सेवा निवृत्त शिक्षकाचे नांव | जन्मतारीख | सेवा निवृत्ती दिनांक | दिनांक 01/07/2024 रोजीचे वय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | | | | | |

Singh 24/7/24

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

**प्रतिलीपी:- माहितीस सविनय सादर.**

1. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, म. रा. पुणे.
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
3. मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली.
4. मा. उप सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**माहितीस सस्नेह अग्रेषीत.**

5. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे.

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.**

6. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
7. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
8. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि.प.गडचिरोली.
9. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली.

Singh 24/7/24

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

Scanned with OKEN Scanner

प्रति.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**मार्फत** :- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, .................

**विषय** :- प्राथमिक शिक्षक / पदविधर शिक्षक / उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता अर्ज.

संदर्भिय पत्रानुसार मी गडचिरोली जिल्हा परिषदेतील पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त जागावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर काम करण्यास तयार आहे. त्याकरीता खालील अटी व शर्ती मला मान्य राहतील.

1. पुर्ण नाव:-
2. पत्रव्यवहाराचा पत्ता :-
3. जन्मतारीख:-
4. दिनांक 01/07/2024 ला वय :-
5. ई-मेल आय-डी :-
6. व्हॉट्सॲप क्रमांक:-
7. यापुर्वी काम केलेले तालुके :- .................. ..................... .......................

**अटी व शर्ती**:-

1. सदर कंत्राटी पदाकरीता कमाल वयोमर्यादा 70 वर्ष राहील.
2. मानधन रु. 20,000/- प्रतीमहा (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त)
3. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेशी विहित अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करणे आवश्यक राहील.
4. नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेली पदस्थापना मान्य राहील, याकरिता कोणत्याही प्रकारचे बाह्यस्थ दबाव आणता येणार नाही.
5. वरील सेवा देण्यास वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अथवा वैद्यकीय अधिक्षक, तालुका ग्रामीण रुग्णालय यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
6. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती दरम्यान कोणतीही आकस्मित घटना घडल्यास कोणत्याही प्रकारचे विमा अथवा इतर लाभ देय ठरणार नाही. सदर नियुक्ती ही अगदी तात्पुरत्या स्वरुपात असल्याने, शासन निकषानुसार कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

**सहपत्र**:- सेवा निवृत्ती आदेश.

आपली/आपला विश्वासु

Scanned with OKEN Scanner